# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- २५०-२२** **दिनांक :- १३/०८/२०२२**

## जुलै महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) रात्रीच्यावेळी विविध बँकेचे ए.टी.एम. फोडण्याचे गुन्हे घडत असल्याने सदरील गुन्हयांना पायबंध घालून दाखल गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक ३/०७/२०२२ रोजी गुप्त बातमीदाराचे मार्फतीने गुन्हे शाखा कक्ष-२ च्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना माहिती मिळाली की, काही इसम हे नालासोपारा पुर्व येथील बँक लुटण्यासाठी प्रगतीनगर येथे येणार आहेत. त्याप्रमाणे दिनांक ३/०७/२०२२ रोजी गुन्हे शाखा कक्ष-२ च्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी नालासोपारा पुर्व, प्रगतीनगर, ९० फुट रोडवर महेशा ॲटो सर्व्हीस स्टेशनचे जवळ सापळा लावुन एकुण ७ आरोपीत नामे १) जाहीद हसन खान, उर्फ जस्सी वय २३ वर्षे, रा. शिकरपुर, ता. तावडु, पोलीस ठाणे - तावडु, जिल्हा नुहु, राज्य हरियाणा, २) वारीस जलालु खान, वय २३ वर्षे, रा. गांव- खिल्लुका, ता. हातीन, पोलीस ठाणे हातीन, जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा, ३) आसीफ मजीद खान, वय २५ वर्षे, रा. गांव- खिल्लुका, ता. हातीन, पोलीस ठाणे हातील, जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा, ४) हाकम हनीफ खान, वय ३३ वर्षे, रा.मिठाका, ता. हातीन, पोलीस ठाणे - बहीण, जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा ५) रघुनंदन शिवअविलाश व्दिवेदी उर्फ पंडीत, वय २४ वर्षे, रा. वसुधंरा बिल्डींग, रु नं. १०६, पहीला माळा, विजयनगर, नालासोपारा पुर्व. मुळ रा. ग्राम मेढरहा, पोष्ट- ढोकसहा, ता. मंजनपुर, जिल्हा-कोशंबी, राज्य- उत्तरप्रदेश, ६) निजाम रमजानी सय्यद, वय ३५ वर्षे, रा. गांव- नंगला इमाम खा, ता.गोवर्धन, पोलीस ठाणे बरसाना, जिल्हा मथुरा, राज्य उत्तरप्रदेश व ७) राजु ऊर्फ समरजीत दयाराम यादव, वय २० वर्षे, रा. महबुपुर, ता. राजपुरा, पोलीस ठाणे - भदोई, जिल्हा भदोई राज्य- उत्तर प्रदेश यांना दरोडयाची तयारी करत असतांना ताब्यात घेतले होते. त्यांचेकडुन गुन्हा करण्याकरिता लागणारे साहित्य, गॅस सिलेंडर, गॅस कटर, गॅस रेग्युलेटर, गॅस पाईप, दोन मोठे सुरे,बॅटरी, पिवळया रंगाच्या नायलॉनची रस्सी, एक लोखंडी पहार, स्क्रु ड्रायव्हर, लाल मिरची पुड, नंबर न लिहीलेल्या नंबर प्लेट, व त्यावर चिटकविण्याचे स्टीकर, मोबाईल फोन व कागदपत्रे असा एकुण ३८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४१२/२०२२ भादंविस कलम ३९९, ४०२ भा.ह.का कलम ४/२५ सह म.पो.अधी. कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद आरोपी हे आंतरराज्यीय मेवाती गँग राज्य हरियाणाचे सदस्य होते व त्यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार, ठाणे, नवी मुंबई इत्यादी परिसरात खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले होते.

| अं.नं. | पो स्टे | गु.रजी नं. व कलम |
|---|---|---|
| १. | विरार | ५०४/२०२२ भादविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| २. | कोळसेवाडी | ३१५/२०२२ भादविस कलम ३८०, ४२७ प्रमाणे |
| ३. | खारघर | १५४/२०२२ भादविस कलम ३८०, ४२७ प्रमाणे |
| ४. | पेण | ११/२०२२ भादंवि ३८०, ३३५ प्रमाणे |

सदर गुन्हयाचे तपासामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सपोनि/ज्ञानेश्वर जगताप, सहाफौज/रमेश भोसले, पोहवा/ संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, प्रशांत पाटील, जगदीश गोवारी, पोना/ प्रशांतकुमार ठाकुर, रमेश आलदर, पो.कॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांचा दिनांक १३/०८/२०२२ रोजी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल'** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



२) दिनांक २२/०६/२०२२ रोजी नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीमध्ये श्री. मोहन सुरु शेट्टी, वय ५६ वर्षे हे त्यांचे मुळ जाण्यासाठी भाईंदर रेल्वे स्टेशन येथे रेल्वेचे रिझर्वेशन करुन परत घरी जात असताना एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, अंगाने मजबुत याने फिर्यादी यांना तो सी.आय.डी ऑफीसर आहे, अशी बतावणी करुन फिर्यादी यांचे गळ्यातील चैन, हातातील आंगठी तसेच रोख रक्कम ८,९००/- रुपये असा एकुण १,१८,९००/- किंमतीचा मुद्देमाल फसवणुक करुन

घेवुन गेला होता. सदरबाबत नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४७५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२०, १७० प्रमाणे अनोळखी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषन करुन आरोपीत नामे मुन्नावर ऊर्फ अन्वर अब्दुल हमीद शेख, वय ४५ वर्षे, रा. सोनाजी घोसावलाच्या मागे, इब्राहीम आईची चाळ, कसाईवाडा, कुरेशीनगर, कुर्ला (प.) मुंबई यास नालासोपारा येथुन ताब्यात घेवुन दि.२७.०६.२०२२ रोजी अटक केली होती. तसेच आरोपीकडुन फिर्यादी यांचे फसवणुक केलेल्या मुद्देमालापैकी १,१०,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले होते. तसेच आरोपीकडे पोलीस कोठडी दरम्यान अधिक कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता त्यांनी नयानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये देखील अशाचप्रकारे गुन्हे केल्याची माहिती मिळाल्याने त्याचेकडून सदर गुन्हयातील १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले होते. अशाप्रकारे एका गुन्हयामध्ये अटक असलेल्या आरोपीकडून त्याने केलेल्या इतर गुन्हयांची उकल करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. सदर आरोपीविरुध्द मुंबई, ठाणे, नवी मुंबई आयुक्तालयात तसेच पश्चिम बंगाल इ. ठिकाणी ४८ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली होती.

सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी श्री डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, वपोनि. श्री. मिलिंद देसाई, नवघर पोलीस ठाणे, वपोनि श्री जितेंद्र वनकोटी, नयानगर पोलीस ठाणे, पोनि/सुशिलकुमार शिंदे (गुन्हे) नवघर, सपोनि/योगेश काळे-नवघर, सपोनि प्रणय काटे-नयानगर, सपोनि पराग भाट-नयानगर, पोउनि/अभिजीत लांडे-नवघर, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/नवनाथ घुगे, सुरज घुनावत, ओमकार यादव, विनोद जाधव, पोहवा विजय गुरव, रियाज बागवान, पोशि महेश खामगळ यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



३) दिनांक १९/०७/२०२२ रोजी फिर्यादी श्रीमती मरीयम सरवर खान वय-५६ वर्षे रा. डांगेवाडी, नालासोपारा यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, त्या दिनांक १०/०७/२०२२ रोजी त्यांचे मुलाकडे माहिम, मुंबई येथे बकरी ईद सणानिमीत्त गेल्या होत्या. घरातुन जाताना त्यांनी घराचे कुलूप बंद केले होते. त्यानंतर फिर्यादी या दिनांक १८/०७/२०२२ रोजी रात्री उशीराने त्यांचे घरी परत आल्या असता त्यांना त्यांच्या घरातील कपाट तुटलेले दिसले. त्यांनी कपाटाची पाहणी केली असता त्यांनी त्यात ठेवलेले २०६.६४० ग्रॅम वजनाचे ७,४४,६५६ /- किंमतीचे सोन्याचे दागिने चोरी झालेले दिसुन आले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३११/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये घडलेल्या सदर गुन्हयाचे व परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता सदरचा गुन्हा हा एका अनोळखी बुरखाधारी महिलेने केला असल्याची माहिती मिळाली. सदर संशयीत महिलेचा शोध घेतला असता सदर सशंयीत महिला वय-२६ वर्षे रा. माहिम, मुंबई येथील राहणारी असल्याने तिला दिनांक २५/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली. सदर अटक महिला आरोपीकडून गुन्हयातील चोरीस गेलेले सर्व २०६.६४० ग्रॅम वजनाचे ७,४४,६५६ /- किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरच्या कामगिरीबाबत श्री विलास सूपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, अमोल तटकरे, पोशि/कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, मपोशि/ जया पाचंगे, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणून मा. पोलीस आयुक्त यांनी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



४) त्याचप्रमाणे वसई पोलीस ठाणे हद्दीमध्ये बँन्डेड सायकली चोरण्याचे वाढलेले प्रमाण लक्षात घेता वसई पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने आरोपी निष्पन्न करुन दिनांक २७/७/२०२२ रोजी भोयदापाडा वसई पुर्व परिसरात सापळा रचुन ४ आरोपीतांना अटक केली होती. सदर आरोपींकडून तपासादरम्यान एकुण ८९,४००/- रुपये किमंतीच्या एकूण २५ सायकल हस्तगत करुन वसई पोलीस ठाण्यामध्ये दाखल एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणले होते.

सदर कामगिरीबाबत वसई पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. कल्याणराव कर्पे, पोनि. श्री. ऋषिकेश पवळ, सपोनि/राम सुरवसे, सपोनि/सुनिल पवार, पोउनिरी/विष्णू वाघमोडे, पोहवा सुनिल मलावकर, पो.कॉ अमोल पाटील, सुर्यकांत मुंढे, राजेंद्र जाधव, शरद पाटील, अक्षय नांदगावकर यांना मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून **स्पेशल रिवॉर्ड क्र-१** दिले आहे.



५) विरार पोलीस ठाणे येथे । गुरनं २३२/२०२२ भादंवि कलम ३०२, २०१, २१२, १२० (ब) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ प्रमाणे दिनांक २६/२/२०२२ रोजी दाखल असलेल्या व बहूचर्चित समय चौहान खून प्रकरणामध्ये १२ आरोपीतांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी क्र १३ अखिलेश शैलेष तिवारी याचा कसोशीने पाठलाग करुन सतत १५ दिवस उत्तर प्रदेश व बिहार राज्यामध्ये अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये शोध घेवून त्यास १४/७/२०२२ अटक करण्यात आली होती. सदर कामगिरी बाबत गुन्हे शाखा युनिट-३ चे पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, शंकर शिंदे. सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश

पवार, पो.अं/ अश्विन पाटील यांना मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून **स्पेशल रिवॉर्ड क्र-२** दिले आहे.



---ooo---